

# गाभण गाई म्हशींचे व्यवस्थापन

- दुग्धव्यवसायामध्ये गाभण गाई-म्हशींचे योग्य व्यवस्थापन हे महत्त्वाचे आहे. अधिक दुग्धोत्पादनासाठी गाई म्हशींच्या पुढच्या वेतातील दूध उत्पादन व्यवस्थापन योग्य असेल तर दुध उत्पादन वाढू शकते.
- शरीरातील आहार घटकांची योग्य पूर्तता न झाल्यास गाभण जनावरे अशक्त होतात. गर्भपात होण्याची शक्यता असते. वासरू कमी वजनाचे जन्माला येते. विताना त्रास होतो. वार वेळेवर पडत नाही. दूध कमी पडते आणि याचा परिणाम आपल्या दुग्ध व्यवसायाच्या अर्थशास्त्रावर पडतो. गाभण जनावरांना आहारातून आवश्यक ती प्रथिने, ऊर्जा, क्षार, जीवनसत्त्वे आणि स्वच्छ पाणी देणे आवश्यक असते.
- गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाने अथवा नैसर्गिक पैदासीने गाभण करवून घेतलेली तारीख पशुपालकाने नोंद करून ठेवावी. गाय-म्हशी गाभण राहिली नसेल, तर तज्ज्ञ पशुवैद्यकाकडून ती तपासून गाभण असल्याची खात्री करून घ्यावी. गाभण असल्यास कृत्रिम रेतनाच्या तारखेवरून ती सर्वसाधारणपणे कोणत्या तारखेला विणार हे निश्चित करता येते. विण्याची तारीख नोंदवहीत किंवा गोठ्यातच नोंदवावी. सध्या अल्ट्रा सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा वापर सुद्धा यासाठी करु शकतो. गर्भावस्थेच्या शेवटच्या तीन महिन्यांत गर्भाचे वजन पहिल्या सहा महिन्यांच्या साधारणपणे दुप्पट वाढते, म्हणून शेवटची तीन महिने गाभण जनावर आणि गर्भ या दोघांच्याही दृष्टीने फार महत्त्वाचे असतात. या काळात दूध झपाट्याने कमी होते, त्यामुळे याच काळात पशुपालकांकडून गाभण जनावरांकडे दुर्लक्ष होते. या काळात गाई-म्हशींच्या शरीरात मोठ्या प्रमाणात ऊर्जा आणि प्रथिने साठवून ठेवणे गरजेचे असते. यांचा उपयोग त्यांच्या दैनंदिन शारीरिक वाढीसाठी, गर्भाच्या पोषणासाठी, कासेतील दूध तयार करणाऱ्या पेशींच्या पुनरुज्जीवनासाठी, रोगप्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी आणि इतर शारीरिक क्रियांसाठी होतो.
- गाभण जनावरांना आहारातून आवश्यक ती प्रथिने, ऊर्जा, क्षार, जीवनसत्त्वे आणि , स्वच्छ पाणी देणे आवश्यक असते, त्यासाठी गाभण जनावरांना नेहमीचा चारा, वैरण आणि शरीर पोषणासाठी आवश्यक असलेल्या पशुखाद्याशिवाय एक ते दोन किलो अधिक पशुखाद्य, त्याबरोबर मुबलक प्रमाणात स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे.
- सातव्या महिन्यापासून पुढे गर्भाच्या वेगाने होणाऱ्या वाढीसाठी, विशेषत: त्यांच्या हाडांच्या वाढीसाठी कॅल्शिअम आणि फॉस्फरस या दोन क्षारांची फार मोठी गरज असते. यासाठी गाभण जनावरांना आहारात आवश्यक ऊर्जा, प्रथिनांबरोबर आवश्यक क्षार मिश्रण द्यावे.
- गाय-म्हैस दूध देणे बंद झाल्यापासून ते पुन्हा दूध देईपर्यंतचा काळ म्हणजे भाकड काळ होय. दुधाळ जनावरांचा भाकड काळ हा ६० ते ९० दिवसांचा असावा. या काळात गाय-म्हैस भाकड केल्यामुळे शेवटच्या दोन ते तीन महिन्यांत गर्भाची वाढ झपाट्याने होते. गाय-म्हशीला विताना त्रास होत नाही, तसेच वार वेळेवर पडते.
- प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गाभण जनावर गर्भपात झालेल्या जनावरांच्या संपर्कातही येणार नाही याची खबरदारी घ्यावी. गर्भपात झालेल्या जनावरांची पशुवैद्यकाकडून तपासणी करून गर्भपात टाळण्यासाठी उपाय योजना करावी.
- गाभण जनावरांना रोज थोडे चालण्याच्या व्यायामाची अत्यंत जरूरी असते, यामुळे त्यांचे स्नायू, तसेच पचनेंद्रिये उत्तम राहतात. यामुळे प्रसूतीच्या वेळी जनावरांना त्रास होत नाही. गाभण जनावरांना शेवटचे तीन आठवडे रानात, तसेच डोंगर भागात चरण्यासाठी पाठवू नये. जनावरांना स्वतंत्र बांधून गोठ्यातच चारा-पाण्याची व्यवस्था करावी.
- गोठा मोठा, स्वच्छ, कोरडा आणि हवेशीर असावा. गोठ्याला जास्त उतार नसावा. उतार जास्त असल्यास गर्भाच्या वजनामुळे मायांग बाहेर येण्याची शक्यता असते. गोठ्यात गाभण जनावरांना बसण्यासाठी गवताचा गादीप्रमाणे वापर करावा.
- गाभण जनावरांना रोज खरारा करावा. जनावर विताना पशुपालकाने योग्यरित्या विशेष काळजी घ्यावी.


**प्रकाशन**

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

www.knpcvs.in



**✲ मार्गदर्शक ✲**

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा,
मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन,
मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण,
मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**✲ संकलन ✲**

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.**